**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.३००५ दि. १४/०९/२०१९**

# प्रेसनोट

दि.१७/०९/२०१९

## आयटी इंजिनिअरच्या गहाळ झालेल्या वस्तू अर्ध्या तासात शोध घेवून परत दिल्या.

### युनिट ४,गुन्हे शाखेची कामगिरी

आज रोजी शत्रुघ्न रॉय, वय ३७ वर्षे रा. गंगा पॅराडाईज, वाघोली हे इसम युनिट ४ कार्यालयात आले व त्यांनी त्यांच्या ऑफिसची लॅपटॉप बॅग, त्यामध्ये एक डेल कंपनीचा लॅपटॉप, एक पाकीट त्यामध्ये २५००/- रुपये रोख, डेबीट कार्ड,क्रेडीट कार्ड व कंपनीची महत्वाची कागदपत्रे ऑफिसला वाघोली ते बालेवाडी असे दुचाकी वरुन जात असताना दरम्यान सदरची बॅग कोठेतरी गहाळ झाल्याबाबत सांगितले. त्याप्रमाणे पोलीस कर्मचारी सचिन ढवळे यांनी लागलीच बॅगमध्ये असलेल्या मोबाईलबाबत माहिती घेवून त्यांचेकडे असलेल्या तांत्रिक ज्ञानाच्या आधारे सदरचा लॅपटॉप व मोबाईल हा महानगर पालिका,शिवाजीनगर भागात असल्याचे कळाले. लागलीच सदर ठिकाणी जावून शोध घेतला असता सदरची लॅपटॉप बॅग त्यामध्ये एक लॅपटॉप कि रु ५७,०००/-, एक मोबाईल फोन कि रु १०,५००/-, एक पाकिट त्यामध्ये २५००/- रोख रुपये, एक डेबीट कार्ड, एक क्रेडीट कार्ड व कंपनीची महत्वाची कागदपत्रे अशा एकुण ७०,०००/- च्या वस्तू मिळाल्या.

शत्रुघ्न रॉय हे बालेवाडी येथील सिमेन्स टेक्नॉलॉजी या खाजगी कंपनीत क्वॉलिटी इंजिनिअर म्हणून नोकरी करीत असून, मूळचे ते झारखंड राज्यातील जमशेदपुर येथील असून, <u>त्यांनी युनिट ४,गुन्हे शाखा,पुणे शहर व पुणे शहर पोलीसांचे आभार मानले आहेत.</u>